महाराष्ट्र शासन

# कला संचालनालय

सर ज.जी.कला शाळा आवार, डॉ.दा.नौ.मार्ग, मुंबई ४००००१ दुरध्वनी.०२२-२२६२०२३१/३२ ईमेल-dirdoa.mum-mah@gov.in

जा.क्रमांक-डिओओ-२०२०/दोन/1209 दिनांक - ०२/११/२०२०

## शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया

महाराष्ट्र शासनाच्या दिनाक ०४/०९/२०२० च्या पत्रान्वये कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, यांच्या नियंत्रणाखालील कला विषयक पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया केंद्रीभूत पध्दतीने, ऑनलाईन स्वरुपात करण्यास मान्यता दिली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता १ वर्ष, २ वर्ष व ४ वर्ष कालावधीच्या पदविका अभ्यासक्रम शासकीय, शासनमान्य अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित कला संस्थाच्या प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी ऑनलाईन नोंदणी करणे, कागदपत्राच्या स्कॅन छायाप्रती अपलोड करणे, कागदपत्रे पडताळणी करणे या प्रक्रियेच्या माहितीसाठी ही सूचना प्रसिध्द करण्यात येत आहे.

कोविड-१९ या महामारीचा संसर्ग विचारात घेता तसेच सामाजिक अंतर (सोशल डिस्टसिंग) राखण्याची आवश्यकता लक्षात घेता वरील शासन आदेशानुसार ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय, शासनमान्य अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित कला महाविद्यालयांमध्ये **जी.डी.आर्ट पदविका अभ्यासक्रम, रेखा व रंगकला (४ वर्ष), उपयोजित कला (४ वर्ष), शिल्पकला व प्रतिमानबंध (४ वर्ष), अंतर्गत गृहसजावट (२ वर्ष), वस्त्रकाम (टेक्सटाईल) (प्रिंटींग ॲन्ड विविंग) (२ वर्ष), मातकाम (सिरॅमिक व पॉटरी) (२ वर्ष) आणि कला शिक्षणशास्त्र पदविका (डिप.ए.एड.)(१ वर्ष)** या अभ्यासक्रमांची प्रथम वर्षाची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीचे निकष www.doa.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

### प्रवेशासाठी ऑनलाईन नोंदणी :-

उमेदवारांनी **दि.०३.११.२०२० पासून १०.११.२०२०** पर्यंत http://cetcell.net/doa/ या संकेतस्थावर ऑनलाईन अर्ज सादर करावेत. उमेदवारांची तात्पुरती निवड यादी तसेच प्रवेश संबंधीचे पुढील नियोजित तारखा https://cetcell.net/doa/ तसेच www.doa.org.in या संकेतस्थळावर यथावकाश प्रसिध्द करण्यात येतील, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

### उमेदवारांना महत्वाच्या सूचना :-

१. उमेदवाराने निवड केलेल्या मागासवर्गीय उमेदवार या प्रवर्गातील (VJ/DT-NT(A), NT(B), NT(C), NT(D), OBC, SBC ) ३१ मार्च २०२१ पर्यंत वैध असलेले नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करतील.

जर हे उमेदवार नॉल-क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करु शकले नाहीत तर अशा उमेदवारांना सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवार मानले जाईल आणि अशा उमेदवारांना प्रवेश प्रक्रियेअंतर्गत राखीव जागांवर दावा करता येणार नाही.

२. जे उमेदवार मुलभूत अभ्यासक्रम तसेच जी.डी.आर्ट पदविका (४ वर्ष) अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये उत्तीर्ण झाले आहेत, त्या उमेदवारांना त्यांच्या संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी दिलेले Provisional Certificate अपलोड करण्याची मुभा असेल.

➢ **प्रवेश, निवड व निर्णय समिती:-**

उक्त प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचणी निर्माण झाल्यास त्याचे निराकरण करण्यासाठी खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | अध्यक्ष |
| २) | अधिष्ठाता, सर ज.जी.कला महाविद्यालय, मुंबई | सदस्य् |
| ३) | अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर | सदस्य् |
| ४) | अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, औरंगाबाद | सदस्य |
| ५) | निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य सचिव |
| ६) | सहायक निरीक्षक, चित्रकला व शिल्प विभागीय कार्यालय नागपूर/औरंगाबाद | सदस्य |
| ७) | प्राचार्य, अनुदानित कला महाविद्यालय | सदस्य |
| ८) | प्राचार्य, विनाअनुदानित कला महाविद्यालय | सदस्य |

**सर्वसाधारण टिप :-**

१. प्रवेशासाठी पात्रता व नियम संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

२.वरील घोषित वेळापत्रक हे अस्थायी स्वरुपाचे आहे आणि यामध्ये अपरिहार्य स्थितीमध्ये बदल संभवु शकतो जर, सुधारीत वेळापत्रक घोषित झाले तर ते http://doa.org.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल. उमेदवारांनी वेळोवेळी अधिक माहितीकरीता संकेतस्थळावर अथवा संबंधित निरिक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई,सहायक निरीक्षक, चित्रकला व शिल्प, विभागीय कार्यालय नागपूर/औरंगाबाद येथे संपर्क साधावा.

(भा.ना.तिखे)
निरीक्षक, चित्रकला व शिल्प,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

(राजीव मिश्रा)
कला संचालक, कला संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई